# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-१२७** **दिनांक - ०१/०४/२०२४**

**अवैध देशी बनावटीचे पिस्टल जवळ बाळगणाऱ्या आरोपीतास अटक करुन त्याच्याकडुन ०२ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे जप्त करण्यास पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.**

सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई बाबतचे आदेश मा. वरिष्ठांकडुन देण्यात आले होते. त्याअनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि.३१/०३/२०२४ रोजी गुन्हेप्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार गस्त करत असतांना १४.३० वा. च्या सुमारास गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडुन एक इसम मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०८ वरील वसई फाटा येथील ब्रिजच्या खाली विना परवाना देशी बनावटीचे पिस्टल घेऊन येणार असल्याबाबत माहिती प्राप्त झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने सपोनि/सोपान पाटील, यांनी पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांना माहिती दिली असता त्यांनी सदर बातमीची सत्यता पडताळुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश व सुचनापर मार्गदर्शन केले होते.

सदर आदेशान्वये पेल्हार पोलीस ठाण्याचे अधिकारी अंमलदार यांनी सापळा रचुन बेकायदेशिर अवैध पिस्टल बाळगणारा इसम - अभिषेक अनिल यादव, वय १९ वर्षे, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास ताब्यात घेऊन त्याची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्या ताब्यात ४०,०००/- रु.किं.चे एक देशी बनावटीचे पिस्टल, ०१ जिवंत राऊंन्ड, ०१ फायटर, एक ५०० रुपये दराची भारतीय चलनातील नोट, एक चिल्ड्रन बँक ऑफ इंडीयाची ५०० रुपये दराची नोट, एक ५,०००/- रुपये किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण ४५,९००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन सदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३७०/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), (३), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हा नोंद झाल्यानंतर आरोपीत यास अटक करुन त्यास विश्वासात घेऊन त्याच्याकडील फोन मधील गॅलरी मध्ये असलेल्या अनेक गावठी कट्टा देशी पिस्टल, राऊन्ड यांचे फोटो दिसुन आल्याने त्याचे राहत्या घराची झडती घेतली असता त्यांच्या घरामध्ये आणखी एक देशी बनावटीचे ४०,०००/- रु.किं.चे पिस्टल व एक जिवंत काडतुस मिळुन आल्याने ते गुन्हयाचे तपास कामी जप्त करण्यात आले असुन गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अप्पर पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री.बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, संजय मासाळ, मिथुन मोहिते, निखील मंडलिक, किरण आव्हाड, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, नितीन सांगळे, नेम.पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**----0000----**


मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
पेल्हार पोलीस ठाणे


पेल्हार पोलीस ठाणे